थिंक महाराष्ट्र

थिंक महाराष्ट्र, लिंक महाराष्ट्र **मुख्य संपादक** : दिनकर गांगल **भ्रमणध्वनी** : ९८६७११८५१७

पुजासॉफ्ट हाऊस, यु-१२८, दुर्गा माता मंदिराजवळ, सेक्टर ४,ऐरोली, नवी मुंबई - ४००७०८

**दिनांक : १ मे २०१०**

'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' ही वेबसाईट दोन महिन्यांपूर्वी सुरू झाली. महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवानिमित्ताने या वेबसाईटवर थोड्या वेगळ्या प्रकारचं लेखन उपलब्ध करून देण्यात आलेलं आहे. संयुक्त महाराष्ट्रात जन्माला आलेले अठरा ते पस्तीस-चाळीस वर्षांदरम्यानचे चार तरूण यांनी महाराष्ट्राबाबतच्या आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. ते चौघे आहेत. १) आशिष कुलकर्णी २) अविनाश सावजी ३) मुक्ता पुणतांबेकर ४) उन्मेष झगडे.

या चौघांचीही व्यवसायक्षेत्रं वेगवेगळी असली तरी त्यांचा सामाजिक क्षेत्राशी संपर्क आहे. त्यामुळे त्यांचे विचार-भावना जाणून घेण्यात रस वाटू शकेल.

संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात ज्या एकशे सहा जणांना हौतात्म्य आले. त्यांपैकी अनंत गोलतकर या पंचवीशीतल्या तरुणाची कहाणी शोकात्म आहे. त्याच्या आंदोलनकाळातच जन्माला आलेली कन्या वासंती आता मोठी झाली आहे. तिची कथाही नरेंद्र काळे यांनी कथन केली आहे. महाराष्ट्राबरोबर गुजरात राज्यही जन्मास आले. गुजरात येथील मराठी माणसांच्या भावना प्रकाश पेठे यांनी मांडल्या आहेत.

संयुक्त महाराष्ट्राचा इतिहास व त्या आंदोलनाचे शिल्पकार आचार्य अत्रे यांच्या संबंधातील विनोद कथा 'थिंक महाराष्ट्र..' वेबसाईटवर आपण आरंभापासून देत आहोत. त्या कदाचित पाहण्यात आल्या असतील. त्यांना वाचकांकडून फार उत्तम प्रतिसाद आहे.

वेबसाईट जाहीर झाली, त्याला लवकरच तीन महिने पूर्ण होतील. त्यानिमित्ताने साईटवर आणखीही काही आकर्षणे देण्याचा प्रयत्न आहे. काही अभ्यास लेखकांनी नियमित लिहिण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे सध्या आपण वेबसाईट दर शुक्रवार-शनिवारी अपडेट करतो. ती आठवड्यातून आणखी काही वारी देखील अपडेट होण्याची शक्यता आहे. लक्ष ठेवावे.

वेबसाईटचे मुख्य उद्दिष्ट मराठी माणसाचा चांगुलपणा व त्याची बुद्धीप्रतिभा व्यक्त होण्याचे ते माध्यम असावे आणि त्यामुळे सुजाण मराठी माणसाचे ते व्यासपीठ बनावे असे योजले आहे. ही वेबसाईट चालवण्यासाठी 'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन' नावाची नॉन-प्रॉफिट कंपनी निर्माण करण्यात येत आहे. तिचे मुख्य सूत्रधार दिनकर गांगल, माधव शिरवळकर, अतुल तुळशीबागवाले व भूषण केळकर आहेत. त्यांना ज्योति शेट्ये, प्रमोद शेंडे, किशोर कुलकर्णी, विदुर महाजन, पद्मा कऱ्हाडे, निलिमा कानेटकर, आदिनाथ हरवंदे, नरेंद्र काळे, सीमा दांडेकर, मंदार दातार यांची साथ लाभली आहे.

अमेरिकेच्या 'महाराष्ट्र फाउंडेशन'ने या प्रकल्पास पहिली तीन वर्षे अंशतः साहाय्य करण्याचे मान्य केले आहे. 'पुजासॉफ्ट टेक्नॉलॉजी'चे माधव शिरवळकर, विश्वनाथ खांदारे व त्यांचे सहकारी हे पहिले वर्षभर वेबसाईटसाठी सर्व तांत्रिक साहाय्य विनामूल्य करत आहेत. 'अल्केमी'चे मंगेश किर्तने यांनी 'थिंक महाराष्ट्र...' च्या कार्यकर्त्यांसाठी दीड दिवसांचे 'व्हिजन वर्कशॉप' मळवली जवळच्या ट्रेनिंग सेंटरवर असेच प्रेमाने योजले. नागरी वाहतूक तज्ज्ञ अशोक दातार यांनी प्रकल्पास एक लाख रूपयांची देणगी कंपनी रजिस्टर होण्याआधीच दिली. असा लोकांचा विश्वास व आपुलकी या प्रकल्पास लाभत आहेत.

मराठी माणसाचा आत्मविश्वास दुणावावा आणि त्याचे सामर्थ्य संवर्धित व्हावे यासाठी सुरू झालेल्या या वेबसाईटला तुमचा प्रत्येकाचा प्रतिसाद हवा आहे. कृपया dinkarhgangal@yahoo.co.in या ई मेल पत्त्यावर लिहा, सूचना करा.

दिनकर गांगल
संपादक
**थिंक महाराष्ट्र डॉट कॉम**